ISSN: 2249-894X IMPACT FACTOR : 5.2331(UIF) VOLUME - 6 | ISSUE - 11 | AUGUST - 2017

REVIEW OF RESEARCH

# भारतातील लघुउद्योगाचे स्वरुप आणि समस्या



**प्रा.डॉ. टि.जी. सिराळ**
**अर्थशास्त्र विभाग प्रमुख, नागनाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, औंढा-नागनाथ, जि.हिंगोली.**

## प्रास्ताविक :

कोणत्याही राष्ट्राच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने मूलभूत आणि अवजड उद्योग महत्वाचे असतात. उदाहरणार्थ, लोखंड, पोलाद, विद्युतशक्ती, रसायने, कोळसा, सिमेंट, अभियांत्रिकी वस्तू इत्यादी अशा अवजड उद्योगांची वाढ आणि विकास केल्यास उत्पादनाच्या नव्या साधनांच्या निर्मितीला चालना मिळते. आणि त्यामुळे भविष्यकाळातील आर्थिक विकासाचा भक्कम पाया रचला जातो. याच उद्देशाने भारतातील दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत अशा उद्योगांच्या स्थापनेला प्राधान्य देण्यात आले. त्या काळात स्थापन केल्या गेलेल्या अवजड उद्योगांच्या स्थापनेला प्राधान्य देण्यात आले. त्या काळात स्थापन केल्या गेलेल्या अवजड उद्योगांचा लाभ आता भारतीय अर्थव्यवस्थेला मिळत आहे. थोडक्यात लोखंड- पोलादासारखे मूलभूत उद्योग आर्थिक विकासाच्या दृष्टीने महत्वाचे असतात.

अर्थात मूलभूत उद्योगाप्रमणेच, लघुउद्योगांचेही आर्थिक, विकासाच्या प्रक्रियेतील महत्व नि:संशय मोठे असते.आज 'आर्थिक, दृष्टया विकसित' म्हणून मान्यता पावलेल्या अनेक राष्ट्रांमध्ये लघुउद्योगांनी महत्वपूर्ण कामगिरी बाजाविली आहे. याचे अत्युत्तम उदाहरण म्हणजे जपान, देशभरात अतिशय घट्ट जाळे असलेल्या लघुउद्योगांनी जपानच्या आर्थिक विकासात मोलाचे योगदान केले आहे. जपानसारख्या विकसित राष्ट्रांप्रमाणेच भारतासारख्या विकसनशील राष्ट्रांमध्येही लघुउद्योगांनी आजवर बजाविलेली कामगिरीची अशीच दखल घेण्याजोगी आहे. अर्थात असे असूनही या उद्योगांपुढे खुप समस्या आहेत, आणि त्यांपैकी काही समस्या तर बऱ्याच गंभीर आहेत. या समस्यांकडे वळण्याअगोदर आपल्या देशातील लघुउद्योगांचे स्वरुप महत्वाचे आहे यासंबंधीची तपशीलवर माहिती प्रथम घेऊ. त्या पार्श्वभूमीवर त्यांच्यापुढील समस्यांचे आपल्याला सुस्पष्टपणाने आकलन होऊ शकेल.

## लघुउद्योगांचे स्वरुप :

प्रथम एक मुद्दा असा लक्षात ठेवणे आवश्यक आहे की, प्रस्तुत विवेचनामध्ये 'उद्योग' असा जरी, शब्दप्रयोग केलेला असला तरी तो 'व्यवसायसंस्था' या अर्थाने वापरावयाचा आहे. लघुउद्योग हे त्यांच्या विश्लेषणाप्रमाणे 'लघु' किंवा 'लहान' असतात. परंतु त्यांचे हे 'लहाणपण' कोणत्या संदर्भातील असते, हा प्रश्न महत्वाचा आहे. स्थूल मानाने असे म्हणता येईल की, ज्या उद्योगांमधील वस्तूंच्या उत्पादनाचे प्रमाण लहान असते, असे उद्योग लघुउद्योग असतात परंतु 'वस्तूंच्या उत्पादनाचे प्रमाण' हा निकष मानण्याऐवजी, कधीकधी उद्योगात केली जाणारी 'संयंत्र' आणि यंत्रसामग्री यांच्या स्वरुपातील गुंतवणूक' हाच निकष वापरुन लघुउद्योगांची व्याख्या पुढील प्रमाणे केली आहे.

'ज्या व्यासाय-संस्थांच्या संयंत्रे आणि यंत्रसामग्री यांच्यामधील गुंतवणूक १ कोटी रुपयांपर्यंत असते, तसेच सुटया भागांचे व यंत्रसाहित्याचे उत्पादन करणाऱ्या ज्या सहायक वा पूरक व्यवसाय-संस्थांमधील गुंतवणूक ७५ लक्ष रुपयांपर्यंत असते, अशा सर्व व्यवसाय-संस्था 'लघुउद्योग' असतात'.

अर्थात, ही अगदी अलीकडच्या काळात केलेली व्याख्या आहे. गेलेल्या चार दशकांच्या काळात आपल्या नियोजनकारांनी लघुउद्योगांच्या व्याख्यांमध्ये अनेक वेळा बदल केलेले आहेत हे लक्षात घेणे जरुरीचे आहे. भांडवली समाग्रीच्या किमती काळाच्या ओघात नेहमीच वाढत असतात. अशा परिस्थितीत, यंत्रसामग्रीच्या संदर्भातील गुंतवणुकीची पैश्याच्या स्वरुपातील एकच कमाल मर्यादा कायम ठेवणे लघुउद्योगाची व्याख्या ठरविण्यासाठी योग्य होणार नाही हा नियोजनकारांच्या निर्णयामागील दृष्टिकोन होता. थोडक्यात लघुउद्योगांच्या बाबतीत भांडवल-गुंतवणुकीची एक कमाल मर्यादा घालून दिलेली असते. एखाद्या व्यवसाय- संस्थेत या कमाल मर्यादेपेक्षा अधिक भांडवल गुंतवणूक झाली असेल तर ती व्यवसाय-संस्था 'लघुउद्योग' म्हणून मान्य केली जात नाही. भांडवल-गुंतवणुकीच्या बाबतील अशी कमाल मर्यादा एकदा घालून दिली की, साहजिकच श्रमाच्या वापराला असलेली संधी वाढते आणि देशातील रोजगारही वाढतो.

**अतिलघुउद्योग :**

१९७७ मध्ये, भारतीय उद्योगरचनेत प्रथम, 'अतिलघुउद्योग' हा एक नवीन प्रकार आला आणि तेव्हापासून भारतीय औद्योगिक रचनेचा तो एक अविभाज्य भाग मानला जातो. अशा उद्योगाची व्याख्या करतांना - १. भांडवल - गुंतवणूक आणि, २.लोकसंख्या, हे दोन निकष वापरले जातात सध्या ज्या उद्योगांमधील, भांडवल-गुंतवणूक ५ लाख रुपयांपर्यंत आहे, आणि जे उद्योग ५०,००० पेक्षा कमी लोकसंख्या असणाऱ्या गावांमध्ये चालविले जातात, अशा उद्योगांना 'अतिलघुउद्योग' म्हटले जाते. भांडवल-गुंतवणुकीच्या दृष्टीने असे उद्योग लघुउद्योगांपेक्षाही लहान असल्याने त्यांच्यासाठी ही संज्ञा वापरली जाते.

'लघुउद्योग' आणि 'अतिलघुउद्योग' यांतील फरक लक्षात घेण्यासारखा आहे. लघुउद्योगांची व्याख्या करताना केवळ भांडवल-गुंतवणुकीची कमाल मर्यादाच सांगितली जाते; लोकसंख्येचा विचार केलेला नसतो. लघुत्तम उद्योगांची व्याख्या करताना मात्र ज्याप्रमाणे भांडवल-गुंतवणुकीच्या कमाल मर्यादेबरोबरच लोकसंख्येची कमाल मर्यादाही सांगितली जाते.

**कुटिरोद्योग :**

लघुउद्योग आणि अतिलघुउद्योग यांच्याबरोबरच, घरगुती किंवा कुटिरोद्योगांचा एक स्वतंत्र विभाग मानला जातो. या विभागचेही तीन उपविभाग पाडले जातात.

१. पहिल्या उपविभागात शेतीच्या जोडीला ज्या उद्योगांमुळे रोजगार पुरविली जातो, असे उद्योग येतात; अर्थात, असा रोजगार अर्धवेळ स्वरुपाचा असतो. हातमाग, टोपल्या विणणे, विडया वळणे, इत्यादींचा यात समावेश होतो.
२. दुसऱ्या उपविभागत मातीची भांडी तयार करणे, सुतार व लोहार काम, सूत काढणे इत्यादी उद्योगांचा अंतर्भाव होतो. या उद्योगांमधील रोजगार पूर्ण वेळ काम पुरविणारा असतो.
३. तिसऱ्या उपविभागात शहरी भागातील घरगुती उद्योग येतात. सोने अथवा चांदी यांची तार काढणे, लाकडावरील नक्षीकाम, खेळणी तयार करणे, इत्यादी.

कुटिरोद्योगांमध्ये बहुधा कौटुंबिक श्रमाचाच वापर केला जातो. भाडोत्री श्रमिक वापरले जात नाहीत. या उद्योगांमधील भांडवल-गुंतवंणूक खूप कमी असते; तसेच या उद्योगांमध्ये तयार होणा-या वस्तूंसाठी बहूधा स्थानिक पातळीवर मिळणारा कच्चा मालच वापरला जातो. आणि या वस्तू प्रामूख्याने स्थानिक बाजारातच विकल्या जातात.

वरील विवेचनावरुन लघुउद्योगांचे स्वरुप लक्षात येईल. आपल्या देशातील विशिष्ट सामाजिक परिस्थिती आणि गरजा लक्षात घेता आपल्या औद्योगिक विकासाच्या कार्यक्रमामध्ये मोठया संघटित उद्योगांबरोबरच लघुउद्योगांची जपणूक आणि संवर्धन समाविष्ट करण्याची नितांत गरज आहे. आपल्या अर्थव्यवस्थेतील लघुउद्योगांच्या खालील प्रमाणे समस्या स्पष्ट करता येतील.

**लघुउद्योगांपुढील समस्या :**

आपल्या देशातील लघुउद्योगाला प्रदीर्घ ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. या क्षेत्रामध्ये समाविष्ट केल्या जाणाऱ्या व्यवसाय-संस्थांचे स्वरुप पूर्णपणे एकसारखे नाही हे लक्षात घेणे जरुरीचे आहे. या दृष्टीने दोन गटांत त्यांची विभागणी करता येईल.

**क) पंरपरेने चालत आलेले लघुउद्योग, ख) आधुनिक लघुउद्योग.**

पहिल्या गटात मोडणारे व्यवसाय प्रामुख्याने ग्रामीण भागत चालणारे, अल्प-भांडवलाचे आणि कमी प्रतीच्या कौशल्यावर आधारलेले असतात. याउलट, दुसऱ्या गटातील व्यवसाय मात्र तुलनेने भांडवलाचा आणि सुधारित तंत्राचा अधिक वापर करणारे आणि नागरी प्रदेशांशी निगडित असे असतात. रोजगार आणि उपभोग-उत्पादनाच्या गरजा भागविण्याचे साधन म्हणून या दोन्ही प्रकारच्या लघुउद्योगांचे आपल्या अर्थव्यवस्थेमधील स्थान निर्विवादपणाने मोठे आहे.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या काळात औद्यागिक विकासाच्या ज्या योजना भारतात राष्ट्रीय आणि राज्यपातळीवर आखण्यात आल्या त्यामध्ये साहजिकच लघुउद्योगांचे महत्व ओळखून त्यांच्या सुसूत्र विकासासाठी विविध प्रकारच्या तरतुदी करण्यावर भर देण्यात आला. गेल्या चार दशकांतील औद्योगिक धोरण विषयक ठरावांमध्ये मोठ्या आणि संघटित उद्योगांबरोबरच लघुउद्योगांच्या वाढीसाठी स्वतंत्र प्रयत्नांची गरज असल्याचे ठामपणाने प्रतिपादन केल्याचे आढळेल. त्यानुसार विविध प्रकारच्या सोयी-सवलती लघुउद्योगांसाठी उपलब्ध करुन देण्यात आल्या, भांडवल, तंत्रज्ञान, कच्चामाल, व्यवस्थापन, विक्री, इत्यादी बाबतीत लघुउद्योगांना सातत्याने उदार आणि सहानुभूतीचे धोरण स्विकारले जाऊनही लघुउद्योगांचे नष्टचर्य संपलेले नाही असा अनुभव आहे. अनेक लघुउद्योग आजारी पडलेले तर काही बंद पडल्याचीही उदाहरणे कमी नाहीत. तेव्हा आपल्या लघुउद्योगांच्या समस्या कोणत्या आहेत, हे विस्ताराने समजावून घ्यावयास हवे.

**अ) कच्च्यामालाच्या उपलब्धतेच्या बाबतीतील समस्या :**

लघुउद्योग विशेषत: ग्रामोद्योग व कुटिरोद्योग प्रामुख्याने स्थानिक पातळीवर उपलब्ध असणारा कच्चामालच वापरतात. जवळपासच्या परिसरात उपलब्ध असणारा कच्चामाल वापरुन उत्पादन करावयाचे असल्याने या संदर्भात या उद्योगांना काहीच अडचण नासावी, असे सकृदर्शनी वाटते. प्रत्यक्षातील परिस्थिती मात्र वेगळीच असते. ग्रामोद्योग व कुटिरोद्योगांना आवश्यक असणाऱ्या कच्चामालाचा साठा स्थानिक व्यापारी बऱ्याच मोठ्या प्रमाणात करुन ठेवतात, आणि अतिशय अवाजवी किंमतीने उद्योजकांना विकतात.

कच्च्या मालाची केवळ किंमतच गैरवाजवी असते, असे नाही; तर अशा कच्च्या मालाचा पुरवठाही कधी कमी, तर कधी जास्त म्हणते अनियमित स्वरुपाच असतो. यात भर म्हणून कधीकधी स्थानिक व्यापारी कच्च्यामालाची विक्री करताना जाचक अटीही घालतात. उदाहरणार्थ, स्थानिक व्यापारी सुताचा साठा करुन हातमाग विणकरांना तो भरमसाठ भावाने विकतात आणि विणकरांनी तयार केलेले कापड कमी किमतीत खरेदी करण्याचीही अट घालतात. यामुळे विणकरांना सुताची (कच्च्या मालाची) मोठी किंमत मोजावी लागते. परंतु कापडाची (पक्क्या मालाची) त्यांना मिळणारी किंमत मात्र कमी मिळते. म्हणजेच त्यांचे दुहेरी नुकसान होते. त्याचप्रमाणे, उच्च प्रतीचा कच्चामालही लघुउद्योगांच्या वाटयाला क्वचितच येतो. त्याच वस्तूचे उत्पादन करणाऱ्या मोठ्या उद्योगांनी (उदाहरणार्थ यंत्रमाग असणाऱ्या कापड-गिरण्यांनी) असा उत्कृष्ट कच्चा माल अगोदरच हस्तगत केलेला असतो. यामुळे शिल्लक राहिलेला निकृष्ट कच्चामालच लघुउद्योगांना मिळतो. परिणमत: त्यांनी तयार केलेला पक्कामालही (कापड) निकृष्ट दर्जाचाच निपजतो आणि त्याला बाजारात मिळणारी किंमतही कमीच राहाते.

### आ) भांडवलाची कमतरता :

भांडवल हा कोणत्याही उद्योगाचा प्राणच असतो. अर्थात, वर उल्लेखिल्याप्रमाणे, लघुउद्योग श्रमप्रधान असल्याने त्यांची भांडवलाची गरज मुळातच कमी असते. परंतु असे कमी प्रमाणात आवश्यक असणारे भांडवलही त्यांना विनासायास मिळत नाही. बहुतके व्यापारी बँका मोठ्या उद्योगांना कर्जाऊ भांडवल पुरविण्यास जितक्या तत्पर असतात, तितक्याच लघुउद्योगांना भांडवल पुरविण्याच्या बाबतीत त्या उदासीन असतात. कुटिरोद्योग व लघुतम (टायनी) क्षेत्राातील उद्योगांना तर बँकासारख्या वित्तीय 'संस्था' कडून फारसे भांडवल मिळतच नाही. अशा परिस्थितीत त्यांना नातेवाईक, मित्र, सावकार यांसारख्या 'व्यक्ती' कडून कर्ज घेण्याचा एकच पर्याय उरतो. अशा कर्जामध्ये अनेक दोष असतात. उदाहरणार्थ , तारणासंबंधीच्या अटी कठोर असतात, व्याजाचे दर कमालीचे जास्त असतात कर्ज देताना व्याजाची रक्कम अगोदरच कापून घेतली जाते, परतफेड केलेल्या कर्जाची रीतसर पावती नेहमी मिळतेच असे नाही. या सर्व गोष्टींमुळे लघुउद्योगांचा भांडवल उभारणीसाठी झालेला एकूण खर्च वाढून बसतो. कच्च्या मालासाठी झालेला खर्च जास्त असतोच. यामुळे एकूण खर्चात वाढ होते, परंतु वस्तुच्या विक्रीपासून मिळणारे उत्पन्न मात्र कमी राहते. वित्तीय दृष्टया असे उद्योग नेहमीच विंवेचनेत असतात. मिळालेल्या नफयातून पुनर्गुंतवणूक करुन व्यवसायाची व्याप्ती वाढविणे त्यांना बहुधा कधीच शक्य होत नाही. यामुळे असे लघुउद्योग कायम 'खुजेच' राहतात.

अलीकडच्या काळात मात्र या परिस्थितीत काही सुधारणा होत आहे. भारतात राष्ट्रीयीकृत व्यापारी बँकांचा ग्रामीण भागातील विस्तार वाढला असून त्या लघुउद्योग क्षेत्राला कर्जाऊ भांडवलाचा पुरवठा करु लागल्या आहेत. त्याच प्रमाणे, अगदी अलीकडच्या काळात तर या क्षेत्राच्या वित्तीय गरजा भागविण्यासाठी 'भारतीय लघुउद्योग विकास बँक' (स्मॉल इंडस्ट्रिज डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया (SIDBI) ) नावाची एक स्वतंत्र वित्तीय संस्थाच स्थापन करण्यात आली आहे.

### इ) ऊर्जा समस्या :

प्रत्येक उद्योगाला कोणत्या ना कोणत्या तरी प्रकारच्या ऊर्जेची गरज असते. उदाहरणार्थ, काही कुटीरोद्योगांना व लघुतम उद्योगांना कोळशाची गरज असते, तर काही लघुउद्योगांना विजेची आवश्यकता असते. कोणत्याही ऊर्जेचा नियमित पुरवठा होणे व तो रास्त किमतीला होणे, हे इतर कोणत्याही उद्योगाप्रमाणे, लघुउद्योगांच्या दृष्टीनेही महत्वाचे असते. या बाबतीतील सामान्य अनुभव असा की ऊर्जेचा प्रकार कोणताही असला तरी तिचा पुरवठा अतिशय अनियमित असतो. केवळ ग्रामीण भागातील कुटिरोद्योग व लघुतम उद्योग यांनाच होणारा ऊर्जा-पुरवठा अनियमित असतो असे नाही, तर शहरी भागातील लघुउद्योगांना होणारा ऊर्जेचा पुरवठाही अनियमितच असतो. इतकेच नव्हे तर अशा ऊर्जांच्या किमतीही जास्त असतात. ऊर्जेच्या पुरवठयामधील ही अनियमितता व खर्चीकता वस्तूच्या उत्पादनातही जशीच्या तशा प्रतिबिंबित होते.

### ई) पारंपारिक व्यवस्थापन पध्दती :

लघुउद्योगांचे विशेषत: ग्रामोद्योग व लघुतम उद्योगांचे एकूणच व्यवस्थापन बरेच जुनाट पध्दतीचे असते. उत्पादनाचे व्यवस्थापन, वित्तीय व्यवस्थापन, विक्री-व्यवस्थापन अशा सर्वच प्रकाचे व्यवस्थापन अनेक वर्षांच्या परंपरेनुसार केले जाते. काही उद्योगांमधील वित्तीय व्यवस्थापन अतिशय निकृष्ट असते, तर काही उद्योगांमध्ये त्याचा संपूर्ण अभावच दिसून येतो. व्यवस्थापनाच्या वरील वेगवेगळया क्षेत्रांमध्ये आधुनिक प्रणाली वापरण्याची त्यांची मानसिक तयारीही नसते. यामुळे आधुनिक व्यवस्थापन प्रणालीच्या सर्व फायद्यांपासून असे उद्योग कायमचे वंचितच राहतात.

### ड) जुनाट यंत्रसामग्री :

व्यवस्थापनातील जुनाटपणाप्रमाणेच, अनेक लघुउद्योगांमधील यंत्रसामग्रीही जुनी आणि कालबाहय झालेली असते. याचा श्रमिकांच्या कार्यक्षमतेवर आणि उद्योगांच्या उत्पादनाच्या प्रमाणावर व दर्जावर प्रतिकल परिणाम होतो. व्यवसाय-संस्थेला मिळणारे उत्पन्न कमी असल्याने नवीन व आधुनिक यंत्रसामग्री घेण्याची आर्थिक कुवतही त्यांच्यात नसते. त्यामुळे अशा परिस्थितीमधून निर्माण होणारे वरील दोष दीर्घकाळ कायम राहतात.

### ऊ) निकृष्ट विक्री व्यवस्था :

वर उल्लेखिलेल्या सर्व गोष्टींचा प्रतिकुल परिणाम लघुउद्योगांच्या उत्पादनावर होत असतो. उत्पादनाचे प्रमाण तर कमी राहतेच, पण उत्पादनाची गुणवत्ता देखील समाधानकारक नसते. अर्थात, लघुउद्योगांपुढील समस्या इथेच संपत नाहीत. कमी प्रमाणात झालेले आणि गुणवत्तेच्या दृष्टीनेही कमी पडणारे उत्पादन जेव्हा बाजारात विकण्याची वेळ येते तेव्हाही या उद्योगांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. एक तर, या उद्योगांची, ज्याला खऱ्या अर्थाने 'व्यवस्था' म्हणता येईल, अशी स्वत:ची विक्री व्यवस्था नसतेच. मर्यादित बाजारपेठेमुळे जाहिराती आणि विक्रयखर्च त्यांच्या

आवाक्याबाहेर राहतात. बहुतेक लघुउद्योगांना त्यांच्या वस्तूंच्या विक्रीसाठी अन्य संस्थांवर विसंबून राहावे लागते. अशा अन्य संस्था 'मध्यस्थ' स्वरुपाच्या असतात. वस्तूच्या उत्पादनासाठी झालेला जादा खर्च, वस्तूचा निकृष्ट दर्जा, पैशांची निकड अशा अनेक कारणांमुळे, मिळेल त्या किमतीला वस्तू विकण्याशिवाय या उद्योगांना कित्येक वेळा पर्यायच नसतो. उत्पादकांच्या अशा परिस्थितीचा गैरफायदा विक्री करणाऱ्या मध्यस्थ संस्थांकडून घेतला जातो. वस्तूची कमी किंमत देणे, संपूर्ण रक्कम एकमुठी न देता हप्त्याहप्त्यांनी देणे, इत्यादी अनेक प्रकारांनी लघुउद्योगांची पिळवणूक केली जाते. कुटीर उद्योग व लघुतम उद्योगांच्या बाबतीत तर मध्यस्थ संस्थांचे अशा प्रकारचे वर्चस्व खूपच जाणवते. जर लघुउद्योगांची स्वतःची विक्री-व्यवस्था असेल तर ती अतिशय निष्प्रभ असते. थोडक्यात, लघुउद्योगाची स्वतःची विक्री व्यवस्था असो अथवा नसो, वस्तूची विक्री हा त्यांच्या दृष्टीने सरते शेवटी एक बेकिफायतशीर सौदाच असतो.

**संदर्भ :**


१. प्रा.छापखाने कि.रा.- 'औद्योगिक घडण व धोरण' पुणे, कॉटिनेंटल प्रकाशन, पहिली आवृत्ती', प्रकरण-५:पृष्ठे ७०-९५, प्रकरण-१५: पृष्ठे ३१२-३३७.

२. Robinson E.A.G., The Structure of Competitive Industry, Cambridge University Press, Reprint 1959, Chap.2,3 , 4, 5, 6,7.

३. Devine P.J.and Others : An Introducation to Industrial Edonomics, London, George Allen and Unwin Ltd., Second Revised Edition, Chap.3, pp. 108-172.

४. Amarjit singh & A. N. Sadhu : Industrial Economics, Bombay, Himalaya Publishing House, First Edition, 1988, Section I, pp.25-50.